# राष्ट्रीय सहकार सप्ताहाचे 'वैमनीकॉम'तर्फे उद्घाटन

**पुणे :** वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थानतर्फे (वैमनीकॉम) सायकल रॅलीचे आयोजन करून अखिल भारतीय सहकार सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. धवलक्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ही रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात वैकुंठभाई मेहता यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. या वेळी सहकार क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाला उजाळा देण्यता आला. राष्ट्रीय सहकार सप्ताहाचे उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डी. के. सिंह यांनी नवी दिल्ली येथून ऑनलाइन पध्दतीने केले. वैमनीकॉमच्या संचालक डॉ. हेमा यादव म्हणाल्या, ''वैमनीकॉम' हे ज्ञान व उद्योग यांच्या एकत्रपणाची एक सुरूवात आहे. संस्था लवकरच विदेश व्यापार संस्थाबरोबर निर्यात व विपणन याचे प्रशिक्षण सुरू करणार आहे.'' राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे रजिस्ट्रार व्ही. सुधीर, डी. के. सिंह, संस्थेचे माजी संचालक डॉ. के. के. त्रिपाठी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सकाळ 16-11-2021